| | |
|---|---|
| MHKO050018142013 | **नियमित दिवाणी दावा क्रमांक ३२०/२०१३ मधील नि. १११ वरील आदेश शिवगोंडा पाटील विरुध्द बाळगोंडा पाटील** |

सदरचा अर्ज वादीने वारस अभिलेखावर आणण्यासाठी दिवाणी न्याय प्रक्रिया संहिता आदेश २२ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी बाळगोंडा नागोंडा पाटील हे दि. २७/०२/२०२१ रोजी मयत झाले आहेत. त्यामूळे मयताचे वारस रेकॉर्डवर आणणे गरजेचे आहे. करीता अर्जातील नमूद मयताचे वारस हे अभिलेखावर घेण्यात यावेत, अशी विनंती वादी यांनी सदर अर्जाद्वार केली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी निशाणी १२२ कडे म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानूसार अर्जातील कथने धादांत, खोटी व लबाडीची, वस्तूस्थितीशी विपर्यास करणारी असल्याने प्रस्तुत प्रतिवादी त्याचा साफ इन्कार करतात. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज कायदयातील कोणत्या तरतुदीखाली दाखल केलेला आहे त्याचा उहापोह वादी यांचे अर्जात नमूद केलेला नाही. वादी यांनी विलंब कोणत्या कारणामुळे झाला याचे स्पष्टीकरण अर्जात नमूद केलेले नसल्यामूळे प्रस्तुत अर्जाचा विचार करता येणार नाही. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज विलंब माफ होवून मिळणेकरीता दाखल केला असून अर्जाचे कामी अबेटमेंट रद्द होणेची मागणी केलेली आहे त्यामूळे जोपावेतो वादी हे स्वतंत्रपणे विलंब माफीचा व अबेटमेंट सेटअसाईटचा अर्ज दाखल करत नाहीत तोपर्यंत वादीचा प्रस्तुतचा अर्ज चालण्यास पात्र नाही. वादी यांनी प्रतिवादींचे वारस रेकॉर्डवर आणणेकरीता किती दिवसांचा विलंब झालेला आहे याबाबतचा कोणताही उहापोह अर्जाचे कामी केलेला नाही. जरुर तर म्हणणे दुरुस्त करु तरी तशी परवानगी असावी. सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करावा, अशी त्यांनी विनंती केली.

४. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले.

५. सदर अर्ज दाखल करण्यास बराच विलंब झाला आहे. निशाणी ११३ च्या दस्तऐवज यादी सोबत वादी यांनी मयत बाळगोंडा नागोंडा पाटील यांचे मृत्यू प्रमाणपत्र प्रमाणित प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यानूसार असे दिसते की, त्यांचा मृत्यू दि. २७/०२/२०२१ रोजी झाला. सदर अभिलेख पाहिला असता निशाणी १११ वरील अर्ज दि. १७/०२/२०२२ रोजी दाखल केला आहे. परंतू सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता व दोन्ही पक्षांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्याकरीता सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे-

## आदेश

१. निशाणी क्र. १११ कडील अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. मयत प्रतिवादी बाळगोंडा नागोंडा पाटील यांचे वारस अर्जात नमूद केल्याप्रमाणे अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात येते. तसेच सदर दुरुस्ती दाव्यात करण्याची परवानगी देण्यात येते. सदर दुरुस्ती वादी यांनी नियमाप्रमाणे करावयाची आहे.

३. खर्चाबाबत आदेश नाहीत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MRUNMAYEE M CHOUDHARY
Date: 2022.10.17 17:30:27 +0530

**ठिकाण - इचलकरंजी.**
**दिनांक - १७/१०/२०२२**

**(एम.एम.चौधरी)**
**४ थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**इचलकरंजी.**